सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, मालवण

मु. पो. कुंभारमाठ ,ता:- मालवण जि.:- सिंधुदुर्ग.- ४१६६०५

**दूरध्वनी :** ०२३६५-२५१३७१ ,**ईमेल :** office.gpmalvan@dtemaharashtra.gov.in

## संस्थास्तरीय प्रवेश फेरी

शासकीय तंत्रनिकेतन मालवण या संस्थेमध्ये संस्थास्तरावर शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या रिक्त असलेल्या जागांमध्ये प्रवेश घेण्याकरिता एक संधी देण्यात येत आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता विहित कलावधीत ऑनलाइन रजिस्ट्रेशन केलेले उमेदवार व जे उमेदवार नॉन कॅप करिता रजिस्ट्रेशन करणार आहेत / केलेले आहेत अशा सर्व उमेदवारांकरिता ही फेरी पुढील वेळापत्रकानुसार आयोजित करण्यात आली आहे.

या फेरीसाठी इच्छुक उमेदवारांनी प्रथम वर्षासाठी दि. ०७ ऑगस्ट २०२६ पर्यंत व थेट द्वितीय वर्षासाठी दि. ०९ ऑगस्ट २०२६ पर्यंत Online पद्धतीने स्वतःच्या Login मधून किंवा संस्थेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून रजिस्ट्रेशन करणे **अत्यावश्यक आहे.** संस्थास्तरीय फेरीसाठी वरील पद्धतीने विहित मुदतीत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची नावे संस्थास्तरीय फेरीच्या गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

## वेळापत्रक

| अनु. क्र. | प्रक्रिया | प्रथम वर्ष | थेट द्वितीय वर्ष |
|---|---|---|---|
| १ | संस्थास्तरीय फेरीसाठी नाव नोंदणी करणे | दि. ०७ ऑगस्ट २०२६ सायं.५.००वा.पर्यंत | दि. ०९ ऑगस्ट २०२६ सायं.५.००वा.पर्यंत |
| २ | संस्थास्तरावर तात्पुरती गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | दि. ०८ ऑगस्ट २०२६ सायं.५.०० वा.पर्यंत | दि. १० ऑगस्ट २०२६ , सायं.५.०० वा.पर्यंत |
| ३ | गुणवत्ता यादीमधील त्रुटींची पूर्तता करणे | दि. ०९ ऑगस्ट २०२६ दुपारी १.०० वा.पर्यंत | दि. ११ ऑगस्ट २०२६ , दुपारी १.०० वा.पर्यंत |
| ४ | अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | दि. ०९ ऑगस्ट २०२६ सायं.५.०० वा.पर्यंत | दि. ११ ऑगस्ट २०२६ , सायं.५.०० वा.पर्यंत |
| ५ | प्रवेश प्रक्रियेस सुरुवात | दि. १२ ऑगस्ट २०२६ सकाळी १०.३०वा. | |

**प्रवेशासाठी पात्रता:**

या फेरीसाठी CAP मधून रजिस्ट्रेशन केलेले, NON CAP मधून रजिस्ट्रेशन केलेले तसेच ज्यांनी या अगोदर कोणत्याही पॉलिटेक्निक मध्ये शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी प्रवेश घेतला आहे असे सर्व उमेदवार पात्र असतील.

**<u>संस्थास्तरीय प्रवेश फेरीची नियमावली</u>**

१) या संस्थास्तरीय फेरीमध्ये केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त असलेल्या व होणाऱ्या जागा भरण्यात येणार आहेत

२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान रिक्त जागा ज्या प्रवर्गा करिता राखून ठेवलेली आहे त्याच प्रवर्गाच्या उमेदवारा मधूनच भरण्यात येईल तदनंतर जागा रिक्त राहिल्यास त्या जागा गुणवत्तेच्या आधारे सर्वांकरीता खुल्या होतील

३) संस्थास्तरीय प्रवेश फेरीमध्ये प्रवेश मिळाल्यास कोणतीही शिष्यवृत्ती योजना लागू होणार नाही तसेच Seat Acceptance fee रुपये 1000/- व संस्थेची प्रवेश फी एकूण रुपये 7750/- Online Payment च्या स्वरूपात त्वरित भरावी लागेल.

४) विद्यार्थ्यांनी इतर संस्थेत प्रवेश घेतलेला असल्यास आणि या फेरीमध्ये प्रवेश मिळाल्यास तेथील प्रवेश रद्द करण्याची ऑनलाईन कार्यवाही स्वतः करावयाची असून या संस्थेची ती जबाबदारी असणार नाही.

५) प्रवेश निश्चित करताना पूर्ण फी, मूळ कागदपत्रे व छायांकित प्रतीचा एक संच सोबत आणावा

६) ज्या विद्यार्थ्यांना जागावाटप होईल त्यांनी त्याच दिवशी प्रवेश मिळालेल्या विभागात आपला प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

<u>विशेष सूचना: या फेरी मधील प्रवेशीत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती / फी- सवलत लागू असणार नाही</u>

**अधिक माहितीसाठी संपर्क:** प्रा. दत्तप्रसाद गोलतकर (9764513133)

**दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी प्रवेश फेरी झाल्यानंतर जागा शिल्लक राहिल्यास शेवटची प्रवेश फेरी दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी वरील नमूद पद्धतीनेच घेण्यात येईल व त्यासाठी नाव नोंदणी मुदत दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत असेल.**

या फेरीसाठी रिक्त जागांची माहिती संस्थेच्या <u>www.gpmalvan.co.in</u> या संकेतस्थळावर **दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी प्रदर्शित करण्यात येईल.**

**प्राचार्य**

**शासकीय तंत्रनिकेतन, मालवण**